# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

दि.०८/११/२०२३

## २५ नोव्हेंबर ला होणार प्रथमच जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा महोत्सव

वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग आयोजित विरार विभागीय आंतर शालेय कला क्रीडा महोत्सवाच्या रौप्य महोत्सवानिमित्त यंदा प्रथमच दिव्यांगांच्या मैदानी स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात येत आहे.

या दिव्यांग मैदानी स्पर्धा मध्ये धावणे २०० मीटर, भालाफेक, गोळाफेक ,थाळीफेक, जलतरण, बॅडमिंटन, ज्युदो, पॉवरलिफ्टींग, कॅरम ,बुद्धीबळ व टेनिस क्रिकेट अशा विविध क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या आयोजना मधील धावणे २०० मीटर, भालाफेक, गोळाफेक ,थाळीफेक, बॅडमिंटन, ज्युदो, व टेनिस क्रिकेट या स्पर्धा विवा महाविद्यालय जूनी इमारत मागील मैदानात होणार असुन कॅरम , बुद्धीबळ या दोन स्पर्धा विवा महाविद्यालय जूनी इमारत व जलतरण, पॉवर लिफ्टींग ह्या स्पर्धा अमेय क्लासिक क्लब, विरार (पश्चिम) येथे नियोजित केलेल्या आहेत. २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या या दिव्यांग क्रीडा स्पर्धा पालघर जिल्हा मर्यादीत असतील.

तरी पालघर जिल्ह्यातील दिव्यांग खेळाडूंनी या स्पर्धेत जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. या स्पर्धेचे **स्पर्धा फॉर्म हे वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, पहिला मजला, क्रीडा विभाग, विरार(पूर्व)**, येथे उपलब्ध आहेत. तसेच या स्पर्धेचे ऑफलाईन पीडिएफ स्वरुपातील फॉर्म **khelpr.in** व **vvcmc.in** या वेबसाईट वरुन डाऊनलोड करता येतील. या स्पर्धेत भाग घेण्याची **अंतिम तारीख २२ नोव्हेंबर २०२३** ही राहील.

**या स्पर्धेच्या अधिकच्या माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क करावा.**

श्री.कैलास घाणेकर- पालघर जिल्हा पॅरा कमिटी- ९३५९३९५१६३

प्रा.श्री. योगेश चौधरी- ९८२२८५१४२६

क्रीडा विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका